| | |
|---|---|
| MHPU180006052023 | काळुराम दत्तु पुणेकर व इतर<br>विरूध्द<br>बाळासो हरिदास कामठे व इतर |

## निशाणी क्र.६६ खाली आदेश

प्रस्तुतचा अर्ज प्रतिदाव्यातील वादीने मयत प्रतिदाव्यातील प्रतिवादी क्र.२ कैलास आप्पा वाळुंजकर यांचेविरुध्द् झालेला अबेटमेंट सेट असाईडचा हुकूम रद्द होण्याकरीता दाखल केला आहे. प्रतिदाव्यातील वादीचे म्हणणेनुसार, सदर प्रतिदाव्यातील प्रतिवादी क्र.२ कैलास आप्पा वाळुंजकर यांचा दि.२६.०७.२०२५ रोजी मृत्यु झाला. सदर प्रतिवादी मयत झाल्याची माहीती वादीस वेळेत मिळाली नाही व वादी हे स्वतः आजारी असल्यामुळे सदरचे वारस अभिलेखावर घेता आले नाहीत त्यामुळे सदरचा दावा अबेट झाला आहे. वादीचे म्हणणेनुसार सदर दावा हा स्थावर मिळकतीसंदर्भात असून त्यावर गुणदोषावर निर्णय होणे आवश्यक आहे. त्यामुळे सदर पक्षकारांचे वारस अभिलेखावर घेणे आवश्यक आहे. त्यामुळे प्रतिवादी क्र.२ यांचेविरुध्द् पारीत झालेला अबेटमेंट सेट असाईडचा आदेश रद्द करण्याची विंनती केली.

२. सदर अर्जावर प्रतिदाव्यातील प्रतिवादींचे म्हणणे मागविण्यात आले असता प्रतिवादी यांनी त्यांचे म्हणणे दाखल केले. प्रतिवादींनी त्यांचे जबाबात सदरचा अर्ज देण्यास उशिर झाला असल्यामुळे तो माफ करून मागितला नाही. त्यामुळे सदर अर्ज नामंजूर करण्याची विनंती केली आहे.

३. अर्ज, म्हणणे वाचले. दोन्ही वकीलांचे म्हणणे ऐकले व कागदपत्रांचे अवलोकन केले. सदरचा प्रतिदावा साठेखत रद्द करून मिळणेकामी व निरंतर मनाईसाठी दाखल केला आहे. सदर दाव्यातील वादीने निशाणी ६५ वर वादी क्र.२ कैलास आप्पा वाळुंजकर हे मयत झाले असल्याची पुरशिस देवून न्यायालयास कळविले आहे. सदर प्रतिदाव्यात प्रतिवादी क्र.२ यांचा वारसांचा सदर प्रकरणातील अचल संपत्तीमध्ये हिस्सा असल्याने त्यांचे हक्क व अधिकारावर सदर दाव्याच्या न्यायनिर्णयाचा परिणाम होणार आहे. सदरचा अर्ज हा वादीने मयत प्रतिवादी क्र.२ हे मरण पावल्यापासुन ९० दिवसांच्या आत दाखल केला नाही. वादीने प्रतिवादी क्र.२ मयत

झाल्याबाबतची माहिती दिली नसल्याने विलंब झाल्याचे नमुद केले. सदर प्रकरणाचे स्वरुप विचारात घेता सदर प्रतिवादी क्र.२ चे वारसांना दाव्यात समाविष्ट करणे गरजेचे आहे. सदर प्रतिवादी क्र.२ मरण पावल्यानंतर ९० दिवसाच्या आत अर्ज करणे गरजेचे होते. त्यामुळे प्रथमदर्शनी प्रतिवादीने सदरचा अर्ज उशीराने केल्याचे बाब अर्जाचे तारखेवरुनच दिसुन येते. सदर विलंब किती झाला याबाबत स्पष्टपणे नमुद करणे आवश्यक नाही. केवळ न्यायालयाने विलंबाचे कारण व दाव्याचे स्वरुप पाहणे गरजेचे आहे. माझ्या मते सदर वादीने प्रतिवादी क्र.२ यांचेविरुध्द् झालेला अबेटमेंट सेट असाईडच्या अर्जात दिलेली कारणे ही संयुक्तिक आहेत. प्रकरणातील दाव्याचे स्वरुप हे अचल संपत्तीच्या संबंधाने असुन प्रकरणातील होणा–या अंतिम न्यायनिर्णयामुळे सदर अर्जदारांचे हक्क व अधिकारावर परिणाम होणार आहे. करीता, मी खालील आदेश परीत करतो –

## आदेश

१. प्रतिवादीचा निशाणी ६६ वरील अर्ज मंजुर करण्यात येत आहे.

२. प्रतिदाव्यातील प्रतिवादी क्र.२ यांचेविरुध्द पारीत झालेला अबेटमेंटचा आदेश रद्द करण्यात येतो.

SHAILENDRA NANDKISHOR PATIL

Digitally signed by SHAILENDRA NANDKISHOR PATIL
Date: 2026.07.23 17:37:07 +0530

ठिकाणः दौंड, **(एस.एन. पाटील)**

दिनांक २३/०७/२०२६ २रे सह. दिवाणी न्यायाधीश क. स्तर,

दौंड, जि. पुणे